# गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ

धेंपो टॉवर, पहिला मजला, ईडीसी पाटो प्लाझा, पणजी–गोवा

फोन: २४३८५२८, २४३८५५०, २४३८५६७, फॅक्स: २४३८५२८ ईमेल: goapcb@rediffmail.com


नं. ११/१५/१७–पीसीबी/एलईजी/१३११७ दिनांक: १२.१०.२०१७

## पर्यावरणीय जाहीर सुनावणीची जाहीर सूचना

ज्याअर्थी पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रायल, भारत सरकार यांनी सुधारणा केल्याप्रमाणे पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन अधिसूचना नं. १५३३ (ई) दिनांकित १४.०९.२००६ च्या अनुसार सदर अधिसूचनेच्या परिशिष्ट I मध्ये समाविष्ट असलेल्या प्रकल्पांमुळे प्रभाविता होणाऱ्या व्यक्तींच्या काळज्या निश्चित करण्यासाठी परिशिष्ट IV मध्ये वर्णन केलेल्या पध्दतीनुसार सदर स्थळी किंवा त्यांच्या अत्यंत जवळ जिल्हा निहाय पर्यावरणीय जाहीर सुनावणी घेतली पाहिजे.

सदर अधिसूचनेच्या परिशिष्ट IV च्या परिच्छेद ७ अनुसार आवश्यक आहे त्याप्रमाणे सदर संपूर्ण जाहीर सुनावणी प्रक्रियेसाठी जिल्हा न्यायदंडाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हा न्यायदंडाधिकारी या पदापेक्षा कमी नाही असा त्यांचा/तिचा प्रतिनिधी पर्यवेक्षण करील व अध्यक्षस्थान भूषवेल व त्यास राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचा प्रतिनिधी सहाय्य करेल.

ज्याअर्थी खालील उल्लेखित तारखेला, वेळ व स्थळी खालील प्रकल्पांसाठी गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने आवश्यकतेनुसार पर्यावरणीय जाहीर सुनावणी घेण्याचे नियोजित केले आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचा तपशिल | तारीख | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | दक्षिण गोव्यात काकोडा येथे प्रस्तावित घन टाकाऊ कचरा व्यवस्थापन सुविधा | १४.११.२०१७ | स. १०.३० वा. पासून | कचरा प्रक्रिया प्रकल्पच्या प्रस्तावित स्थळी काकोडा–कुडचडे–गोवा येथे (दक्षिण गोव्यात केपे तालुक्यात काकोडा गावात सर्व्हे क्र. १६७ व १६८ मध्ये स्थित असलेली एमएसडब्ल्यु डंपसाईट) |

ही जाहीर सुनावणी स्थानिक बाधित लोकांच्या काळज्या निश्चित करण्यासाठी असून यावेळी त्यांना स्वत:चे विचार व्यक्त करता येतील किंवा प्रकल्प प्रस्तावकर्त्याकडून माहिती किंवा स्पष्टीकरणं मिळवता येतील. सदर संबंधित व्यक्ती ज्यांना प्रकल्पाच्या किंवा कार्याच्या पर्यावरणीय बाबींमध्ये काही ठळक मुद्दे असल्यास त्यांनी जाहिर सुनावणीच्या निर्धारित तारखेरोजी किंवा तत्पूर्वी आपले विचार, सूचना, अभिप्राय व आक्षेप लेखी स्वरुपात प्रादेशिक अधिकारी, पर्यावरण वन व हवामान बदल मंत्रालय बेंगलोर यांच्याकडे किंवा गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ पाटो, पणजी–गोवा यांच्याकडे पाठवावेत.

प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये असलेल्या कोकणी, मराठी आणि इंग्रजी भाषेतील कार्यकारी सारांशाच्या हार्डप्रती, मसूदा पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अहवाल व अर्ज–१ प्रकल्प प्रस्तावकर्त्याकडून सादर असून तो संदर्भासाठी खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे. सदर सॉफ्टप्रती गोवा राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या वेबसाईट www.goaspcb.gov.in वरती उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| १. | जिल्हाधिकारी व जिल्हा न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय (दक्षिण) नवीन कलेक्टोरेट बिल्डिंग, मडगाव–गोवा |
| २. | पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाचे प्रादेशिक कार्यालय, दक्षिण क्षेत्र, चौथा मजला, इ व एफ विंग, १७वा मुख्य रस्ता, दुसरा ब्लॉक, कोरमंगला, बेंगलोर ५६००३४ |
| ३. | संचालक यांचे कार्यालय, उद्योग, व्यापार व वाणिज्य संचालनालय, उद्योगभवन, पणजी – गोवा |
| ४. | उपजिल्हाधिकारी व एसडीओ यांचे कार्यालय, केपे तालुका, केपे, गोवा |
| ५. | अध्यक्ष यांचे कार्यालय, दक्षिण जिल्हा पंचायत, आर्लेम रोड, राय, सासष्टी गोवा |
| ६. | मुख्याधिकारी यांचे कार्यालय, कुडचडे – काकोडा, नगरपालिका मंडळ, रेल्वे स्टेशन रोड, कुडचडे –गोवा |
| ७. | मुख्याधिकारी यांचे कार्यालय, सांगे नगरपालिका मंडळ, सांगे –गोवा |
| ८. | मुख्याधिकारी यांचे कार्यालय, केपे नगरपालिका मंडळ, केपे गोवा |
| ९. | मुख्याधिकारी यांचे कार्यालय, कुंकळी नगरपालिका मंडळ, कुंकळी – गोवा |
| १०. | सचिव यांचे कार्यालय, ग्रामपंचायत किर्लपाल –दाभाळ, धारबांदोडा – गोवा |
| ११. | सचिव यांचे कार्यालय, ग्रामपंचायत बाळळी –अडणे, केपे – गोवा |
| १२. | सचिव यांचे कार्यालय, ग्रामपंचायत आंबावली, केपे – गोवा |
| १३ | सचिव यांचे कार्यालय ग्रामपंचायत असोल्डा, केपे–गोवा |
| १४ | सचिव यांचे कार्यालय ग्रामपंचायत अवेडे –कोठंबी –चायफी, केपे–गोवा |
| १५ | ग्रामपंचायत मळकर्णे यांचे कार्यालय, केपे–गोवा |
| १६ | ग्रामपंचायत शेल्डे यांचे कार्यालय, केपे –गोवा |
| १७ | ग्रामपंचायत भाटी यांचे कार्यालय, सांगे–गोवा |
| १८ | ग्रामपंचायत काले यांचे कार्यालय सांगे –गोवा |
| १९ | ग्रामपंचायत रिवण यांचे कार्यालय सांगे–गोवा |
| २० | ग्रामपंचायत उगे यांचे कार्यालय, सांगे–गोवा |
| २१ | सचिव यांचे कार्यालय , ग्रामपंचायत सावर्डे, सांगे–गोवा |
| २२ | सचिव यांचे कार्यालय , ग्रामपंचायत कुर्डी–वाडेम–सांगे, गोवा |
| २३ | ग्रामपंचायत किर्लपाल–दाभाळ यांचे कार्यालय, सांगे–गोवा |
| २४ | ग्रामपंचायत चांदोर यांचे कार्यालय, कावरे, सासष्टी–गोवा |
| २५ | ग्रामपंचायत गिर्दोली यांचे कार्यालय, सासष्टी–गोवा |
| २६ | ग्रामपंचायत माकाझन यांचे कार्यालय, सासष्टी –गोवा |
| २७ | ग्रामपंचायत पारोडा यांचे कार्यालय, सासष्टी–गोवा |
| २८ | ग्रामपंचायत पंचवाडी यांचे कार्यालय, फोंडा–गोवा |
| २९ | ग्रंथपाल यांचे कार्यालय, तालुका वाचनालय, रेल्वे स्टेशनमागे, कुडचडे–गोवा |
| ३० | गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालय, पणजी–गोवा |

सदर पर्यावरणीय जाहीर सुनावणीचा कार्यवृत्तांत पर्यावरण व हवामानाबद्दल वन मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यात येईल.

सदस्य

सचिव, **गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळासाठी**